# औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
## महानगरपालिका, औरंगाबाद

जा.क्र.मनपा/आरोग्य/एनएचएम/161/२०१९ दिनांक :05/06/२०१९

## दरपत्रक सुचना

औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरंगाबाद, अतर्गत सीपीएमयु युनिट, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमाकरिता इनोव्हा/ स्विफट डिझायर/स्कॉरपिओ तत्सम इत्यादीपैकी सुस्थितीतील मेक मॉडल एक (०१) वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. सदरील वाहन ३ वर्षापेक्षा जुने असू नये. याकरिता नोंदणीकृत वाहनधारक/कंत्राटदार एजन्सीकडुन अल्पमुदतीची दरपत्रक सुचनेव्दारे दोन लिफाफा पध्दतीने दिनांक:- 15/06/२०१९ पर्यंत अल्प मुदतीची दरपत्रक सुचना मागविण्यात येत आहे.

## दरपत्रक भरण्यासाठी कार्यपध्दती :-

तांत्रिक निवीदेमध्ये कुठल्याही प्रकारचे दर नमुद करु नये. नसता निवीदा रद्द करण्यात येईल. सर्व प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. ज्या निवीदाधारकांचे निविदेतील अटी व शर्ती पुर्ण केलेल्या असतील त्याच निवीदा धारकांचे व्यावसायीक दरपत्रक उघडण्यात येईल. याबाबत औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका औरंगाबाद कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील. निविदा उघडण्याच्या वेळेस निवीदाधारक उपस्थीत राहु शकतील.

### अ) तांत्रिक निविदा :-

१. फर्म/एजन्सीचे /संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. पत्ता
३. मोबाईल क्रमांक
४. एजन्सीच्या नावाचे पॅन कार्ड सत्यप्रत
५. वाहन पुरवठा करण्याबाबत अनुभव प्रमाणपत्र
६. पुर्ण निविदा सर्व माहितीसह एजन्सीच्या अधिकृत व्यक्तीने शिक्का व स्वाक्षरी करावी. (तांत्रिक निवीदेमध्ये दर भरण्यात येऊ नये)
७. वाहनाची कागदपत्रे, विमा प्रमाणपत्र
८. ईएमडी रु.५०००/-Aurangabad City Urban Health Society, Municipal Corporation Aurangabad या नावे राष्ट्रीयकृत बॅकेचा डीडी फक्त.
९. कंत्राटदार यांनी वाहन मालकाकडुन ना-हरकत प्रमाणपत्र ई-निविदा प्रसिध्द
१०. झाल्यानंतर रु.१००/- बॉण्ड पेपरवर द्यावे लागेल.

### ब) व्यावसायिक दरपत्रक :-

व्यावसायिक दरपत्रक शेडयुल-१ मध्ये दर भरण्यात यावे.

छरपत्रक प्रक्रियेने वाहन भाडे तत्त्वावर घेण्यासाठी खालील अटी व शर्ती :-

१. Air Condition असलेल्या वाहनाची उपलब्ध करुन द्यावी लागेल.

२. वहन प्रतिमाह १८०० कि.मी. चालेल अतिरिक्त कि.मी. चे दरपत्रक स्वतंत्रपणे देण्यात यावे.

३. नियमाप्रमाणे टॅक्सीची आकारणी करुन देयकातून कपात करण्यात येईल.

४. इंधन, वंगण, दुरुस्ती, वाहन चालकाचे वेतन, टोल भाडे इ. ची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.

५. वाहन ३ वर्षापेक्षा जूने असू नये.

६. वाहनांची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे, तसेच सदरहू वाहनाऐवजी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची राहील. याकरिता अतिरिक्त दर दिले जाणार नाही.

७. वाहनाचा कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकावर राहील. याकरिता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाकडून कोणत्याही प्रकारचा निधी मिळणार नाही.

८. भाडयाने दिलेले वाहन नादुरुस्त झाल्यास मालकाने पर्यायी वाहन उपलब्ध करुन न दिल्यास या कार्यालयाकडून दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन घेण्यात येऊन त्याचे भाडे संबंधीत नादुरुस्त झालेल्यावाहनाच्यामालकाकडून बाजार भावाच्या दराने जे प्रती दिवस दर देण्यात येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे देयकातून भाडे कपात करण्यात येईल.

९. वाहन धारकाने प्रत्येक महिन्यात फिरती केलेल्या लॉगबुकची सत्यप्रत सदस्य सचिव तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, ओरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या स्वाक्षरीसह अहवाल सादर केल्याशिवाय भाडे अदा करण्यात येणार नाही.

१०. शासकीय, निमशासकीय सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या नावावर वाहन असल्यास निविदा प्रक्रियेमध्ये त्यांच्या वाहनाचा विचार केला जाणार नाही.

११. वहन पुरवठादारास औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका ओरंगाबाद यांच्याशी करार करणे आवश्यक आहे.

१२. वाहनचालकाकडे अधिकृत वाहन परवाना (Valid Motor Licenses) असावा.

१३. वाहनावर राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा Logo असणे आवश्यक आहे.

१४. वाहन तसेच वाहन चालक वेळेवर उपलब्ध नसने, वारंवार दुरुस्ती असणे, वाहन चालकाचे गैरवर्तन इत्यादी कारणांसाठी दंडातमक कार्यवाही करण्यात येईल.

१५. दरपत्रकाच्या शर्ती व अटीचे पालन न केल्यास पुर्व सूचना न देता दरपत्रक रदद करण्यात येईल.

१६. अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा रदद करणे याबाबतचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरी अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१७. सदर वाहन केवळ १० महिन्यांकरिता भाडेतत्वावार घेण्यात येत आहे.

Schedule – 1

व्यावसायीक निवीदा (Commercial Bid)

मी/आम्ही ..................................................नोंदणीकृत एजन्सी / संस्था / कंत्राटदार निविदा पुस्तिकेतील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे अवलोकन केलेले असून त्या सर्व मला / आम्ळाला मान्य असून मी / आम्ही इनोव्हा, स्विफट डियाझर, स्कॉपिओ यापैकी एक वाहनाचा पुरवठा करण्यासाठी खालील प्रमाणे दर सादर करत आहे / आहोत.

| अ. क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| ०१ | इनोव्हा / स्विफट डिझायर/ स्कॉरपिआ या पैकी एक वाहनाचा पुरवठा करणे | वहन चालक, इंधनासह १८०० कि.मी. टोल चार्ज व भत्तासह रु.<br>(अक्षरी रुपये .........................<br>प्रतिमाह व त्यापुढील प्रति कि.मी. करिता रु. (रुपये......................) इतके दर सादर करण्यात येत आहे. |

दिनांक :-

ठिकाण:-

**स्वाक्षरी व शिक्का**
**एजन्सी**

**सदस्य सचिव**
**तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी**